**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २६ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **वीर बालदिनाचं औचित्य साधून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार वितरित.**
2. **बँकांमध्ये दीर्घकाळ दावा न झालेल्या ठेवी, संबंधितांना परत मिळाव्यात, यासाठी रिझर्व बँकेची विशेष मोहीम.**
3. **नायलॉन मांजा वापरल्यास मोठ्या आर्थिक शिक्षेची तरतूद करण्याबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा प्रस्ताव.**
4. **वाशीम इथं 'वत्सगुल्म' जिल्हा मराठी साहित्य संमेलनाला ग्रंथदिंडीनं प्रारंभ; कथाकथन, कविसंमेलनासह दोन दिवस भरगच्च कार्यक्रम.**

वीर बाल दिन

वीर बालदिनाचं औचित्य साधून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्काराने देशभरातील १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील २० बालकांना सन्मानित करण्यात आलं. राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात महिला व बालविकास मंत्रालयाच्या वतीने हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. शौर्य, विज्ञान-तंत्रज्ञान, कला-संस्कृती, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण या सात क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीसाठी या बालकांचा गौरव करण्यात आला, त्यात ९ मुले आणि ११ मुलींचा समावेश आहे. महाराष्ट्राच्या छत्रपती संभाजीनगर येथील १७ वर्षीय अर्णव महर्षी यांना विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अर्णवने लकवाग्रस्त रुग्णांसाठी AI-आधारित पुनर्वसन उपकरण विकसित केल आहे. राष्ट्रपतींनी पुरस्कारार्थी बालके ही ‘भारताच्या अमृत पिढी’चे खरे प्रतिनिधी असल्याचं सांगत २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न त्यांच्या संकल्पामुळे साकार होईल, असा विश्वास व्यक्त केला.

***आप जैसे वीर और प्रतिभाशाली बच्चे निरंतर अच्छा काम करते रहेंगे। ये तो शुरुआत है जिंदगी बहुत उड़ान करने के लिए बात की है। मुझे लगता है आपके***

***प्रतिभा से भारत  जरूर उत्साहित होगा और बहुत सारे बच्चे आपको फॉलो करेंगे वो भी अपना अपना हुनर दिखाने के लिए वो भी प्रयास जरूर करेंगे।***

पंतप्रधान-वीर बाल दिन

शीख धर्माचे दहावे गुरु गोविंदसिंह यांचे सुपुत्र साहेबजादे बाबा जोरावर सिंग आणि साहेबजादे बाबा फतेह सिंग यांच्या हौतात्म्याचं स्मरण आज केलं जात आहे.  संपूर्ण देश आज साहेबजादा बाबा जोरावर सिंह आणि बाबा फतेह सिंह यांच्या अतुलनीय शौर्य आणि त्यागाचं स्मरण करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी केलं.  ते आज नवी दिल्लीत वीर बाल दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

***वो वीर साहबजादे जिन्होंने उम्र और अवस्था की सीमाओं को तोड़ दिया, जो क्रूर मुगल सल्तनत के सामने ऐसे चट्टान की तरह खड़े हुए कि मजहबी कट्टरता और आतंक का वजूद ही हिल गया।***

बाल दिन

इतिहास हा भावी पिढीला दिशादर्शक असतो. इतिहासातून आपण काय घेतले पाहिजे, हे महत्वाचे असून विद्याश्र्यांनी यशस्वी होण्याकरीता मूल्यांची जपवणूक आणि आपल्या कर्तव्यांची जाणीव या गोष्टींना सर्वोच्च महत्व दिल पाहिजे, अस प्रतिपादन संत गाडगेबाबा अमरावती  विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनिषा कोडापे यांनी व्यक्त केल. आज देशभर वीर बाल दिवस संपन्न होत आहे, त्यानिमित्त  विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

बँक विशेष मोहीम

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनानुसार बँकांमध्ये दीर्घकाळ दावा न झालेल्या ठेवी संबंधित खातेदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत मिळाव्यात, यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हा अग्रणी बँक कार्यालयामार्फत सोमवार, दि. 29 डिसेंबर रोजी दुपारी 12 वाजता जिल्हा नियोजन भवन, बुलढाणा इथं विशेष शिबिराचं आयोजन करण्यात आल आहे. या शिबिरामध्ये 10 वर्षांपेक्षा अधिक

कालावधीपासून बँक, पेंशन, विमा, शेअर, म्युच्युअल फंड आदी ठिकाणी जमा असून व्यवहार न झालेल्या रकमेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नागरिकांनी उद्यम पोर्टल किंवा संबंधित बँक किंवा संस्थेच्या संकेतस्थळावर आपले नाव तपासून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बँक शाखेत अर्ज करावा, अस आवाहन करण्यात आल आहे.

शहीद उधम सिंह

थोर स्वातंत्र्यसेनानी शहीद उधम सिंह यांच्या १२६ व्या जयंतिनिमित्त आज देश त्यांचं स्मरण करत आहे.  जालियनवाला बागेत जमलेल्या देशबांधवांवर गोळ्या झाडण्याचे आदेश देणाऱ्या मायकल ओडवायर या ब्रिटीश अधिकाऱ्याची त्यांनी हत्या केली होती. स्वातंत्र्य लढ्यात सुरू झालेल्या गदर चळवळीचे ते सक्रिय सदस्य होते.

मनमोहन सिंग

माजी पंतप्रधान  मनमोहन सिंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाच्या आर्थिक प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला आणि आर्थिक सुधारणा घडवून लाखोंना गरीबीतून बाहेर काढलं असं कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे. लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, आणि कॉंग्रेसच्या अनेक नेत्यांनी डॉ सिंग यांना आदरांजली वाहिली आहे.

नायलॉन मांजा- नागपूर खंडपीठ

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नायलॉन मांजाविरोधात कडक कारवाईसंदर्भातील आदेश पारित केला आहे. यानुसार, नायलॉन मांजा वापरणारे अल्पवयीन मुलांचे पालक आणि  प्रौढ वापरकर्त्यांना प्रत्येकी ५० हजार रु. दंड आकारण्याचा प्रस्ताव आहे, तर विक्रेत्यांकडून प्रत्येक उल्लंघनासाठी २.५ लाख रु. जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नागपूर खंडपीठासमक्ष निवेदन द्यायचे असल्यास ५ जानेवारीपर्यंत हजर राहावे, असे आवाहन यवतमाळचे

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे. निवेदन न दिल्यास प्रस्तावित दंड वसूल करण्यास कोणताही आक्षेप नसेल, असेही जाहीर करण्यात आले आहे.

नायलॉन मांजा

दरम्यान,प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या विक्रीविरोधात अमरावती जिल्हयातील  राजापेठ पोलिसांनी कडक कारवाई करत आरोपीच्या घरातून सुमारे २० हजार रुपयांचा नायलॉन मांजा जप्त केला. यासंदर्भात चिचफैल परिसरात छापा टाकून एका इसमाला ताब्यात घेण्यात आल असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या कारवाईत मोनो काईट आणि  गोल्ड कंपनीचा बंदी घातलेला नायलॉन मांजा जप्त करण्यात आला असून, पोलिस प्रशासनाने नागरिकांना नायलॉन मांजाचा वापर आणि विक्री टाळण्याच आवाहन केलं आहे.

जी राम जी

२०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीनं विकसित भारत जी राम जी योजने अंतर्गत विकासकामं राबवण्यात येतील असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी सांगितलं आहे. दूरदर्शनला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी संगितलं की जीरामजी योजनेत सव्वाशे दिवस काम पुरवण्याची तरतूद आहे, तसंच कामासाठी अर्ज केल्यापासून १५ दिवसात काम मिळालं नाही तर बेरोजगारी भत्ता देण्याचीही सोय आहे----

या योजनेसाठी प्रशासकीय खर्च १ लाख ५१ हजार कोटी रुपये अपेक्षित असून त्यात केंद्र सरकारचा वाटा ९५ हजार कोटीपेक्षा जास्त आहे.

साहित्य संमेलन

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, यांच्या अनुदानातून एस.एम.सी. शिक्षण प्रसारक मंडळ वाशीम संस्थेच्या वतीन, आज आणि उद्या  'वत्सगुल्म' जिल्हा मराठी साहित्य संमेलन होत आहे. आज सकाळी वाशीमचे ग्रामदैवत बालाजी मंदीरापासून ग्रंथदिंडीने संमेलनास प्रारंभ झाला. कथाकथन, कविसंमेलन, प्रकट मुलाखत, चर्चासत्र, विनोदी कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम आणि तीन परिसंवाद, अशा

विविध उपक्रमांमधून माय मराठीचा जागर होणार असून दोन दिवस वाशीमकरांना साहित्यिक मेजवानी मिळणार आहे.

महिला क्रिकेट

महिला क्रिकेटमध्ये भारत विरुद्ध श्रीलंका तिसरा टी-ट्वेंटी सामना आज तिरूवनंतपुरम इथं होणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरूवात होईल. पाच सामन्यांच्या मालिकेत भारतीय महिला संघ दोन- शून्यने आघाडीवर आहे.

हवामान

हवामान -विदर्भात गोंदिया जिल्ह्यात आज ९.४ इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. गोंदिया पाठोपाठ भंडारा आणि यवतमाळ जिल्ह्यात १० अंश सेल्सिअस तर नागपूर इथं १०.६ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये तापमान 11 ते 13 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.

*****